## ★ प्रवेश पात्रता ★

### वर्ग ११ वी मध्ये प्रवेश

११ वीचे बर्गात प्रवेश मिळविण्याबाबत ज्या विद्यार्थिनी एस.एस.सी. परीक्षा पास झाल्या असतील त्या प्रवेशासाठी पात्र राहतील. या अभ्यासक्रमासंबंधी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य यांचेकडून वेळोवेळी आलेल्या सूचना विद्यार्थिनींना बंधनकारक राहतील.

### वर्ग १२ वी मध्ये प्रवेश

१२ वीचे वर्गात मान्यताप्राप्त महाविद्यालय अगर शाळेमधून ११ वीची परीक्षा पास झालेले विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतील.

## ★ अभ्यासक्रम ★

महाविद्यालयात खालीलअभ्यासक्रम शिकविण्यात येतात. कनिष्ठ महाविद्यालय (माध्यम मराठी) वर्ग ११ व १२ वी च्या विद्यार्थिनींनी विषयाची निवड पुढीलप्रमाणे करावी.

### वर्ग ११ वा कला शाखा

**आवश्यक विषय :** (१) इंग्रजी (२) मराठी

**ऐच्छिक विषय :** आवश्यक विषयाशिवाय या गटातून कोणतेही चार विषय विद्यार्थिनींना निवडावे लागतील.

(१) राज्यशास्त्र किंवा भुगोल
(२) समाजशास्त्र/अर्थशास्त्र
(३) आहारशास्त्र (आवश्यक)
(४) मानसशास्त्र/इतिहास/गृहव्यवस्थापन

### वर्ग १२ वा कला शाखा

**आवश्यक विषय :** (१) इंग्रजी (२) मराठी

**ऐच्छिक विषय :** आवश्यक विषयाशिवाय या गटातून कोणतेही चार विषय विद्यार्थिनींना निवडावे लागतील.

(१) राज्यशास्त्र किंवा भूगोल
(२) समाजशास्त्र/अर्थशास्त्र
(३) मानसशास्त्र/इतिहास/बालसंगोपन
(४) वस्त्रशास्त्र (आवश्यक)

**टीप :** विद्यार्थिनीने इयत्ता ११ वीत ज्या विषयाचा अभ्यास केलेला व तो विषय इयत्ता १२ वीत घ्यावयाचा नसेल तर अशा विषयाचा ११ वी चा अभ्यासक्रम इयत्ता १२ वीत पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थीनी, पालकांवर व शिक्षकांवर राहील.

## अनुसूचित जाती जमातीसाठी राखिव प्रवेश

| संवर्ग | टक्केवारी |
|---|---|
| (१) अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३ टक्के |
| (२) अनुसूचित जमाती | ०७ टक्के |
| (३) विमुक्त जमाती (१४ तत्सम जाती) | ०३ टक्के |
| (४) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५ टक्के |
| (५) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती) | २.५ टक्के |
| (६) भटक्या जमाती (बंजारी व तत्सम जमाती) | ०.२ टक्के |
| (७) इतर मागासवर्गीयांकरिता (ओबीसी) | १९ टक्के |
| (८) विशेष मागासवर्ग | ०.२ टक्के |

**ओळखपत्र :**

प्रवेश मिळाल्यावर ३० दिवसांच्या आत आपले ओळखपत्र तयार करून त्यावर प्राचार्यांची सही घेणे आवश्यक आहे. विद्यार्थिनीने ओळखपत्रासाठी आपला पासपोर्ट साईजचा फोटो प्रवेश घेते वेळी महाविद्यालयात द्यावा लागेल.

प्रत्येक विद्यार्थिनीजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. वाचनालयातील पुस्तक, मासिक व इतर सोई ओळखपत्राच्या आधारावर दिल्या जातील. विद्यापीठ व बोर्डाच्या वार्षिक परीक्षेसाठी ओळखपत्र आवश्यक राहील. महाविद्यालयात सुद्धा प्रत्येकाने आपले ओळखपत्र सोबत बाळगावे.

**महत्त्वाची सूचना :**

अनुसूचित जाती जमाती व भटक्या अन्य जाती आणि मागासवर्गीय विद्यार्थिनींना त्यांच्या मॅट्रिक नंतरच्या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती संचालक, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत दिल्या जाते. खालील अपवाद वगळता इतर सर्व मागासवर्गीय विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती मिळू शकते.

**खालील विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळणार नाही :**

(१) व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनीला शिष्यवृत्ती मिळणार नाही. **(उदा. डी.एड. झाल्यानंतर लॉ घेणाऱ्या विद्यार्थिनी, बी.एड.ला प्रवेश)**

(२) वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती मिळणार नाही.

(३) समान अभ्यासक्रमाला पुन्हा शिष्यवृत्ती मिळणार नाही.

## किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रम

स्वावलंबन या मुख्य उद्देशाने विद्यार्थीनींकरिता अभ्यासक्रम राबविण्यात येतो.

**आवश्यक विषय :** (१) इंग्रजी (२) मराठी

**ऐच्छिक विषय :** (खालील पैकी कोणताही एक अभ्यासक्रम)

(१) Cookery (कुकरी)

(२) Creche & Preschool Management
(पाळणाघर व पूर्व प्राथमिक शाळेचे व्यवस्थापन)

(३) Accounting & Auditing

या अभ्यासक्रमात व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षणाची यंत्रणा आहे. ज्या प्रशिक्षणांतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थिनीला कौशल्य हस्तगत करण्यावर भर दिला जातो. ज्ञान, कौशल्य व अभिकृती यावर प्राथमिक लक्ष्य केंद्रित करण्यात येते.

किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम हा महाराष्ट्र शासनाने राबविलेला +२ स्तरावरील उपक्रम आहे. हे अभ्यासक्रम औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण केंद्र (I.T.I.) यांच्या अधिपत्याखाली राबविले जातात. अभ्यासक्रमानंतर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थीनींना केवळ बोर्डाची गुणपत्रिकाच नव्हे तर आय.टी.आय.चे प्रमाणपत्र सुद्धा देण्यात येते.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिकाऊ उमेदवार योजनेमध्ये एका वर्षासाठी ठराविक वेतना नुसार नोकरी सुद्धा देण्यात येते. पुढील भविष्यासाठी अर्थसहाय्य मिळण्याकरीता जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कर्ज घेण्यास हा अभ्यासक्रम महत्वाचा ठरतो.

## अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये

(१) व्यवसायाला लागणारे संपूर्ण ज्ञान
(२) ६०% प्रात्यक्षिके
(३) शिकाऊ उमेदवारी योजना
(४) आय.टी.आय. चे प्रमाणपत्र
(५) कर्ज मिळण्यास प्राधान्य
(६) स्वयंरोजगाराची / रोजगाराची हमी